MHSO140019482023

दाखल तारीखः– १०/०८/२०२३
नोंद तारीखः– १०/०८/२०२३
निकाल तारीखः– १३/०३/२०२६
कालावधीः– ०२ वर्षे ०७ महिने ०३ दिवस

| | | |
|---|---|---|
| | **मे. श्रीमती गायत्री एस. पाटील यांचे न्यायालयात**<br>**सध्या – प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ता.बार्शी, जि. सोलापूर**<br>**(न्यायनिर्णय दिनांक १३ मार्च २०२६)**<br>**(नियमित फौजदारी खटला क्र.३८६/२०२३) नि.क्र. २७** | |
| | (एफ.आय.आर/गुन्हा नं.२७९/२०२३ बार्शी शहर पोलिस स्टेशन) | |
| तक्रारदार / अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>बार्शी शहर पोलीस ठाणे, ता. बार्शी,<br>जि. सोलापूर. |
| व्दारे प्रतिनिधित्व | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर.बी. काजळे. |
| आरोपी | | **१) हर्षद दत्ता पोटभरे,**<br>वय – २९ वर्षे, धंदा– ड्रायव्हर,<br>रा.धनेगांव, ता. केज, जि. बीड. |
| व्दारे प्रतिनिधित्व | | विधिज्ञ श्री. पी. बी. लोखंडे |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १५/०४/२०२३ |
| एफ.आय.आर तारीख | १७/०४/२०२३ |
| दोषारोपपत्र तारीख | १०/०८/२०२३ |
| दोषारोप तारीख | १७/१०/२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरुवात तारीख | २६/०२/२०२६ |
| निकाल राखुन ठेवला ती तारिख | निरंक |
| निकालाची तारिख | १३/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

## आरोपी तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारिख | जामिनावर सुटकेची तारिख | दोषारोप | जर निर्दोष अथवा दोषी असेल तर | शिक्षा ठोठावलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४२८ चे उद्देशाने खटल्या दरम्यान कोठडी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | **हर्षद दत्ता पोटभरे** | २७/०६/२३ रोजी सी.आर.पी.सी. प्रमाणे कलम ४१(१) अन्वये नोटील दिली | -- | भा.द.वि.कलम ४०६ | निर्दोष | -- | -- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा. १ | अमोल अशोक गायकवाड (नि.क्र.२२) | फिर्यादी |

**ब. बचावपक्षाचा साक्षीदारः नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदारः नाही.**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार निशाणी यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १) | निशाणी क्र. २१ | तडजोड पुरसिस |
| २) | निशाणी क्र.२३ | फिर्याद वरील फिर्यादीची सही. |
| ३) | निशाणी क्र.२५ | घटनास्थळ पंचनामा. |
| ४) | निशाणी क्र.२६ | जप्ती पंचनामा. |

**ब. बचावपक्ष : तपासले नाही.**

**क. न्यायालयीन निशाणीः नाही.**

**ड. मुद्देमाल क्रमांक :**

| अ.क्र. | मुद्देमाल वर्णन | मुद्देमाल क्रमांक |
|---|---|---|
| | -- | -- |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक १३ मार्च २०२६)

१. प्रस्तुत प्रकरणातील आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ४०६ अन्वये दंडनीय अपराध केल्याच्या आरोपाखाली फौजदारी खटला चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची हकीकत पुढीलप्रमाणे अशी आहे की,**

प्रस्तुत प्रकरणामध्ये अमोल अशोक गायकवाड, रा. रेल्वे स्टेशन रोड, संभाजी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर हे फिर्यादी आहेत. ते कुटूंबासह एकत्रात राहणेस असून मजुरी करुन उदरनिर्वाह करतात. दिनांक १८/१०/२०२२ रोजी ते दिनांक १५/०४/२०२३ रोजीचे दरम्यान आरोपी हर्षद दत्ता पोटभरे यांनी फिर्यादीचे मालकीची आयशर कंपनीची ट्रक मॉडेल १११४ मॉडेलची गाडी क्र. एचएच–०४– जीसी–१५९७ ही फिर्यादीचे विश्वास संपादन करुन त्याचा वापर करुन ट्रक परत न देता ट्रक देण्यास टाळाटाळ करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वापरुन फिर्यादीचा विश्वासघात केला. म्हणून फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द बार्शी शहर पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली.

३. सदर फिर्यादच्या आधारे बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ४०६ प्रमाणे गुन्हा रजिस्टर नं. २७९/२०२३ दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलिस नाईक् श्रीमती. विद्या अरुण पवार, बार्शी शहर पोलीस स्टेशन यांनी केला. तपासाअंती आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४०६ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी हजर झाल्यानंतर नि.क्र.०८ नुसार आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४०६ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपीस ते वाचून दाखविले असता आरोपीने (नि.क्र. ०९) प्रमाणे गुन्हा नाकबूल करुन प्रकरणाची संपरिक्षा करावी अशी विनंती केली.

५. तसेच मूळ फिर्यादी यांनी सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी कथनान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी यांचेविरुध्द पुरावा आढळून न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेले नाही.

६. प्रस्तूत प्रकरणातील वस्तूस्थितीवरुन माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणासहीत पुढीलप्रमाणे देत आहे.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| १) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक १८/१०/२०२२ ते १५/०४/२०२३ रोजी मौजे बार्शी शहरातील रेल्वे स्टेशन रोड, संभाजी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे आरोपी याने फिर्यादीचे मालकीची आयशर कंपनीचा ट्रक मॉडेल १११४ नंबर एमएच–०४–जीसी–१५९७ ही वाहन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्याचा वापर करुन ट्रक परत न देता ट्रक देण्यास टाळाटाळा करुन स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वापरुन फिर्यादीचा विश्वासघात केला व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड विधान संहिता मधील कलम | नाही. |

| | |
|---|---|
| ४०६ प्रमाणे गुन्हा केला? | |
| २) अंतिम आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ साठी

७. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ अमोल अशोक गायकवाड यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, साक्षीदार आरोपीस ओळखतात, तो साक्षीदाराचा मेव्हणा आहे. सन २०२२ साली साक्षीदाराकडे आयशर ट्रक होता आणि त्याचा क्रमांक, गाडी कोणाकडून विकत घेतली हे साक्षीदारास आठवत नाही. साक्षीदार यांनी सदर गाडी आरोपीला चालवायला दिली होती आणि आरोपी भाडेसाठी घेत जात असे आणि साक्षीदारास पैसे देत होता. दिनांक १५/०४/२०२३ रोजी काय झाले होते हे सदर साक्षीदारास आठवत नाही. त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. परंतु तक्रार का दिली होती हे साक्षीदारास आठवत नाही. साक्षीदार यांना फिर्यादी (नि.क्र.२३) दाखवली, त्यावरील सही साक्षीदाराची आहे. परंतु त्यातील मजकूराबाबत साक्षीदारास माहित नाही. साक्षीदार पुढे कथन करतो की, त्याच्याकडे आयशर कंपनीचे १११४ मॉडेलची गाडी तिचा नं. एमएच–०४–जीसी–१५९७ असा होता व ती साक्षीदाराने शकील शेख याच्याकडून विकत घेतले होते हे साक्षीदारास आठवत नाही.

८. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. सदर साक्षीदारास उलटतपासादरम्यान असे उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले की, ट्रक घेतल्याचे नंतर आरोपी हर्षद त्यावर ड्रायव्हर होता व तो जळगाव ते कोईमतूर ट्रक चालवत होता, ट्रक वेळोवेळी भाडयाला जात असताना देखील आरोपीने भाडयाचे पैसे दिले नाहीत, पैसे देत नसल्यामुळे तो ट्रकचे पैसे वेळोवेळी मागितले की तो टाळाटाळ करत होता, साक्षीदाराने ट्रक परत मागितला त्यावेळी आरोपी उडवाउडवीचे उत्तर देत होता, दिनांक १५/०४/२०२३ रोजी चार वाजताच्या सुमारास साक्षीदार आरोपीच्या

घरी गेले व त्याच्याकडे ट्रक दिसली नाही म्हाणून चौकशी केली परंतु आरोपीने उडवाउडवीची उत्तर दिले, त्यामुळे साक्षीदार दिनांक १७/०४/२०२३ तारखेला तक्रार दिली. सदर उत्तर सूचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली आहेत. त्यांना त्यांच्या फिर्यादमधील रेखांकित भाग–अ मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला असता त्यावर सही त्यांचीच असल्याचे कथन केले आहे. परंतु त्यातील मजकूर खरा व बरोबर नसल्याचे व पोलिसांनी तसे का लिहीले याबाबत त्यांना माहिती नसल्याचे अभियोग पक्षातर्फे उलटतपासादरम्यान कथन केले आहे. तसेच (नि.क्र.२१) वरील तडजोड पुरसिस पाहता,फिर्यादी आणि आरोपी यांच्यामध्ये आपसात तडजोड झाल्याचे स्पष्ट होत आहे.

९. अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदाराचा तोंडी पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सदर साक्षीदाराने आरोपीविरुद्ध गुन्हादर्शक कथन केले नाही. अशा परिस्थितीत अभिलेखावरील उपलब्ध ईतर पुरावा ध्यानात घेणे जरुरीचे आहे. तसेच फिर्यादीने पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाने घटनास्थळावरील ईतर साक्षीदार यांची साक्ष नोंदविली नाही. आरोपी याने घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा मान्य केला असलातरी ही आरोपीनेच फिर्यादीच्या मालकीचा मॉडेल १११४ ची ट्रक क्र. ०४–जीसी–१५९७ ही देण्यास टाळाटाळ करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वापरला ही सिध्द होवू शकलेली नाही.

१०. आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम ४०६ प्रमाणे दोषारोप ठेवलेले आहे. साक्षीदार क्र. १ फिर्यादी यांनी आरोपीने फिर्यादीचे विश्वास संपादन करुन त्याचा वापर करुन करुन मॉडेल १११४ ची ट्रक क्र. ०४–जीसी–१५९७ ही देण्यास टाळाटाळ करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वापरुन फिर्यादीचा विश्वासघात केला याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे एकंदरीत सर्व परिस्थिती व पुरावा ध्यानात घेता अभियोगपक्ष आरोपीने फिर्यादीचा विश्वासघात केला ही बाब निःसंशयपणे शाबीत करु शकले नाही.

११. आरोपीविरुध्द भा.द.वि. कलम ४०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेले आहे. याठिकाणी आरोपीचा गुन्हा शाबीत करण्याकरिता सदर गुन्हयाचे मुलभूत घटक ध्यानात घेणे जरुरीचे आहे. भा.द.वि. कलम ४०६ प्रमाणे व्याख्या दिलेली आहे. जर एखाद्या व्यक्तीकडे

पैसे, मालमत्ता किंवा वस्तु विश्वासाने दिली आणि त्या व्यक्तीने ती स्वतःच्या फायद्यासाठी वापरली, लपवली किंवा परत देण्यास नकार दिला तर सदरचा अपराध विश्वासघात मानला जातो. अशा परिस्थितीत उपरोक्त सर्व कारणमीमांसा ध्यानात घेता आरोपीने फिर्यादीकडून वापरण्यास घेतलेली मॉडेल १११४ ची ट्रक क्र. ०४–जीसी–१५९७ हे वाहन स्वतःच्या फायद्यासाठी वापरुन फिर्यादीस परत देण्यास नकार दिला ही बाब संशयाच्या पलीकडे जावून सिध्द होवू शकलेली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२साठी</u>**

१२. फौजदारी प्रकरणांमध्ये आरोपींचा गुन्हा शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने आरोपीचा गुन्हा निःसंशयपणे शाबीत करण्याकरिता सबळ पुरावा दिला नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्ष आरोपी विरुध्दचा गुन्हा सबळ पुराव्याअभावी शाबीत करु शकले नाहीत. तसेच साक्षीदारांच्या पुराव्यावरुन असे निष्पन्न होते की, आरोपीने फिर्यादीचे विश्वास संपादन करुन त्याचा वापर करुन मॉडेल १११४ ची ट्रक क्र.एमएच–०४–जीसी–१५९७ ही वाहन देण्यास टाळाटाळ करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वापरुन फिर्यादीचा विश्वासघात केला ही बाब नाकारली आहे. त्यामुळे साक्षीदाराविरुध्द त्यांनी खोटी साक्ष दिली आहे म्हणून कारवाई करणे उचित होणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील सर्व बाबी व परिस्थिती तसेच अभिलेखावरील पुरावा व मुद्यांवरील निष्कर्ष या सर्व बाबी लक्षात घेवून आरोपीस सदर गुन्हयातून निर्दोष सोडणे उचित राहिल. मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश करण्यात येतो.

## **<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१ हर्षद दत्ता पोटभरे, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४०६ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी यांनी खटला प्रलंबित असताना दिलेले जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रु. १५,०००/– चे वैयक्तिक जातमुचलक्याची पूर्तता करावी.

४. या न्यायनिर्णयाची प्रत फिर्यादी यांना संबधीत जिल्हाधिकारी यांचे मार्फत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला.)

GAYATRI SUDHAKAR PATIL
Digitally signed by GAYATRI SUDHAKAR PATIL
Date: 2026.03.16 17:20:44 +0530

(श्रीमती गायत्री एस. पाटील)

दिनांक – १३/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी, जि. सोलापूर